**MHPU180013382023**

नि. दिवाणी दावा क्र. ३०६/२०२३
सौ. मंगल ढमाले
विरुध्द
दत्तात्रय पासलकर

<u>निशाणी क्रमांक २१ वरील आदेश</u>
(पारीत दिनांक १७/०८/२०२४)

प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी यांनी लेखी जबाब दाखल करण्याकामी झालेला विलंब माफ करुन लेखी जबाब दाखल करण्यास परवानगी मिळण्याबाबत केलेला आहे.

२. प्रतिवादी यांच्या म्हणण्यानुसार वादी यांनी प्रस्तुतचा दावा निरंतर मनाई व दस्त रद्द करण्याकामी दाखल केलेला असून त्यांना दाव्याची नोटीस प्राप्त झाल्यानंतर ते त्यांच्या वकीलांमार्फत न्यायालयात हजर झाले आहेत. त्यानंतर प्रतिवादी यांच्या वयोमानानुसार त्यांची प्रकृती ठिक नसल्याने त्यांना संबंधीत कार्यालयातून महत्वाची कागदपत्रे प्राप्त करता आली नाहीत. त्यामुळे त्यांना लेखी जबाब दाखल करण्याकामी विलंब झालेला आहे. सदरचा विलंब हा जाणून बूजून झालेला नसून अनावधानाने तो वैयक्तीक अडचणीमुळे झालेला असल्याने नैसर्गिक न्यायतत्वानुसार झालेला विलंब माफ करुन त्यांना लेखी जबाब दाखल करण्यास परवानगी देण्याची त्यांनी विनंती केली आहे.

३. वादी यांनी त्यांचे म्हणणे दाखल करुन सदर विलंब माफीचा अर्ज बेकायदेशीर असून प्रतिवादी यांनी त्यांना किती दिवसांचा विलंब झाला आहे हे अर्जामध्ये नमूद केलेले नसल्याचे कथन केले आहे. वादी यांच्या म्हणण्यानुसार सदरचा अर्ज हा संधीग्ध स्वरुपाचा असून त्यामध्ये नमूद केलेली कारणांच्या पृष्ठयार्थ कोणतेही कागदोपत्री पुरावे न्यायालयात दाखल केलेली नाहीत. त्यामुळे त्यांनी सदरचा अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली आहे.

४. प्रतिवादी व वादी यांचे अर्जाचे व म्हणण्याचे अवलोकन केले. दोन्ही विद्वान वकीलांचा युक्तीवाद ऐकला. वरिल बाबींचा विचार करता प्रतिवादी यांच्या म्हणण्यानुसार ते वयोवृध्द असल्याने व त्यांच्या आजारपणामुळे ते निर्धारित वेळेत लेखी जबाब, महत्वाची कागदपत्रे न मिळाल्यामुळे दाखल करुन शकले नाहीत. या उलट वादी यांच्या म्हणण्यानुसार प्रतिवादी यांनी संदिग्ध स्वरुपाचा अर्ज दाखल केलेला असून नमूद केलेल्या कारणांबाबत कागदपत्रे दाखल केलेली नाहीत. संपूर्ण संचिकेचे अवलोकन केले असता असे

दिसून येते की, प्रस्तुतचा दावा हा स्थावर मालमत्ते बाबत आहे. त्यामुळे प्रतिवादी यांना नैसर्गिक न्यायतत्वानुसार म्हणणे मांडण्याची संधी देणे आवश्यक आहे. अभिलेखावरुन असे दिसून येते की, प्रतिवादी यांना दि. १८/१२/२०२३ रोजी समन्सची बजावणी झालेली असून त्यांनी जास्तीत जास्त ९० दिवसांमध्ये लेखी जबाब दाखल करणे गरजेचे होते. परंतु, त्यांनी प्रस्तुतचा अर्ज हा दि. ०७/०६/२०२४ रोजी दाखल केल्याचे दिसून येते. म्हणून वरील सर्व बाबींचा विचार करता प्रतिवादी यांना लेखी जबाब दाखल करण्यास परवानगी देण्यासोबतच वादी यांना प्रतिवादीमुळे झालेला विलंबाबाबत भरपाई देणे आवश्यक असल्यामुळे मी पुढील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

<u>आदेश</u>

सदरचा अर्ज रक्कम रुपये ५००/-(रुपये पाचशे फक्त )
खर्चासह मंजूर करण्यात येतो.

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by KALDATE SHARAD BALBHIM
Date: 2024.08.22 16:55:26 +0530

दिनांक- १७/०८/२०२४.

**(शरद ब. काळदाते )**
२ रे सह दिवाणी न्यायाधीश,
क. स्तर, दौंड,जि. पुणे.

# CERTIFICATE

I affirm that the contents of this P.D.F file, Order are same, word to word, as per the original order.

| | | |
|---|---|---|
| Name of the Steno | :- | Deepak A. Merukar, Grade-3 |
| Court / Panel | :- | (Sharad B. Kaldate)<br>2nd Jt. C.J.J.D. & Judicial Magistrate First Class (Court No. 2) Daund. |
| Order / Judgment date | :- | 17/08/2024. |
| Order / Judgment singed by the Presiding Officer on | :- | 17/08/2024. |
| Order/ Judgment uploaded on | :- | 22/08/2024. |